नियमित दिवाणी दावा क. 19 / 2012
सय्यद अहेमद विरूध्द गंगाबाई
निशाणी 199 वर आदेश
CNR No. MHPA140000452012

1. प्रतिवादी क. 4 ने सदर अर्ज वादीच्या हक्कात दिलेला निशाणी 5 वरील आदेश रद्द करण्यासाठी अथवा सदर दावा काढून टाकण्यासाठी दाखल केलेला आहे.

2. त्यांचे म्हणण्याप्रमाणे सदर प्रकरण पुराव्यासाठी असून वादी पुरावा देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्ज दाखल करतेवेळी मयत वादी यांचे जागे वारस रेकॉर्डवर घेण्याची प्रक्रिया चालू होती. तत्पुर्वी प्रकरण पुराव्यासाठी प्रलंबित होते. परंतु, वादीने पुरावा तहकुबीसाठी कोणताही अर्ज न्यायालयात दिलेला नाही. त्यामुळे, त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करून प्रकरण बंद करावे अथवा निशाणी 5 वरील आदेश रद्द करावा अशी विनंती केली.

3. वादीतर्फे त्यांचे सविस्तर म्हणणे मांडण्यात आले. त्यांचे म्हणण्याप्रमाणे वादीचे पुराव्यासाठी प्रकरण प्रलंबित नसल्याने त्यांनी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे, त्यांनी सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

4. प्रतिवादी क. 4 व वादीतर्फे सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आला. अभिलेखावरील पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज दिनांक 16.07.2018 रोजी दाखल करण्यात आला होता. परंतु, तत्पुर्वी दाखल केलेल्या निशाणी 195 वर कोणताही आदेश पारीत न झाल्याने तो अर्ज युक्तिवादासाठी ठेवण्यात आला होता. सदर निशाणी 195 वर दिनांक 26.07.2018, 13.07.2018, 18.08.2018, 21.08.2018, 03.09.2018, 19.09.2018, 29.09.2018 रोजी कोणताही युक्तिवाद झालेला रोजनाम्यावरून दिसून येत नाही. तद्नंतर दिनांक 15.10.2018 रोजी उभय पक्षाचे विद्वान वकिलांचा निशाणी 195 वर युक्तिवाद ऐकण्यात आला. त्यानंतर, लगेचच पुढील तारखेला अर्थात दिनांक 22.10.2018 रोजी निशाणी 195 वरील अर्ज निकाली

काढण्यात आला. त्यानंतर, निशाणी 184 वरील अर्ज युक्तिवादासाठी नेमण्यात आला. निशाणी 184 वर दिनांक 16.11.2018 रोजी आदेश पारीत करून तो निकाली काढण्यात आला. निशाणी 184 चा अर्ज वारस अभिलेखावर आणण्यासाठीचा होता. त्यामुळे, तो अर्ज निकाली काढल्यानंतर प्रकरण वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी व त्यानंतर दुरूस्ती दावा दाखल करण्यासाठी ठेवण्यात आले. वादीतर्फे दिनांक 14.12.2018 रोजी दुरूस्ती दावा दाखल करण्यात आला. रोजनाम्यावरून असे दिसून येते की, तद्नंतर प्रकरण निशाणी 199 वर अर्थात सदर अर्जावर युक्तिवादासाठी ठेवण्यात आले. परंतु, त्यानंतर देखिल सुमारे आठ वेळेस या अर्जावर युक्तिवाद करण्यात आला नाही. त्यामुळे, सदर प्रकरण निशाणी 199 वर युक्तिवादासाठी प्रलंबित होते. अशा परिस्थितीत, वादीने त्यांचा पुरावा दिलेला नाही, असे म्हणणे योग्य होणार नाही. याउलट, प्रतिवादीतर्फे विशोधित वादोत्तर कथन दाखल करणे बाकी असल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरून व रोजनाम्यावरून दिसून येते. परंतु, त्याबद्दल कोणताही अर्ज अभिलेखावर दिसून येणार नाही.

5. करीता, वरील सर्व विवेचनावरून व अभिलेखावरील कागदपत्रांवरून मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

1. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

2. वादीने नियमाप्रमाणे पुरावा देण्याचे करावे.

3. पक्षकारांनी आपापला खर्च सोसावा.

स्वाक्षरीत/–
(विशाल व्ही. देशमुख)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
पुर्णा

दिनांक : 27.06.2019